■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २८० ■ शनिवार दि.२८ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 280 ■ Saturday Dt.28 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार करणारे विजय पवार आणि खाटोकर अजूनही मोकाट..!

## बीड जिल्ह्यातील डझनभर नेते काय कामाचे, एकही नेता पुढे येऊन बोलला नाही?




अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

# बेंबीच्या देठापासून ओरडणाऱ्यांनो लेकीच्या अब्रूचं तुम्हाला काही देणं-घेणं नाही का?

## संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, ओबीसी नेते लक्ष्मण हाके, आ.सुरेश धस, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया लेकीच्या इज्जतीसाठी आवाज का उठवत नाहीत?

- ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूलचा संचालक विजय पवार सर्वच राजकीय नेत्यांच्या संपर्कात मग पैसे कमवण्यासाठी म्हणायचा का?
- एरव्ही किरकोळ कारणांवरून आवाज उठवणारे राजकीय नेते या प्रकरणात गप्प का?
- सर्वच मोठमोठ्या नेत्यांसोबत विजय पवार का फिरत होता या नेत्यांनी यावर स्पष्ट बोलावं?
- बीड जिल्ह्यात शांतता ठेवायची नाही असं राजकीय नेत्यांनी ठरवलं आहे असं म्हणायला हरकत नाही?
- पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब, अजून आरोपी का सापडत नाही आपल्याकडून जिल्हा वाशीयांना उत्तराची अपेक्षा?




बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नावाजलेल्या उमाकिरण शैक्षणिक संकुलात विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोन शिक्षकांनी एका अकरावीच्या वर्गातील मुलीचा वर्षभर लैंगिक छळ केला. याप्रकरणात गुरुवारी (दि. २६) रात्री गुन्हा दाखल होताच शुक्रवारी याचे पडसाद उमटले. लोक आक्रमक झालेले पाहून पोलिसांचा फौज फाटा वाढविण्यात आला होता, तर शिक्षकांना तात्काळ बेड्या ठोका, असे म्हणत काही पालकांसह सामाजिक कार्यकर्त्यांनी क्लासच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. यामुळे काही वेळ तणाव निर्माण झाला होता. बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये ना जातीचा ना धर्माचा परंतु नक्कीच एक नेता या जातीचा ना त्या जातीचा पण वादग्रस्त बोलून बीड जिल्ह्यात दूध कसं नाचवायचं शांतता कशी भंग करायची हे राजकीय नेत्यांकडून शिकले पाहिजे, स्वर्गीय संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर मात्र आता बीड जिल्ह्याला वेगळी कलाटणी मिळालेली आहे.

बीड जिल्हा हा बिहार आहे आणि बिहार पेक्षाही महाभयंकर आहे असं आता महाराष्ट्रातील इतर नेत्यांना व जनतेला वाटत आहे. कारण बीड जिल्हा हा स्वर्गीय संतोष यांच्या हत्येनंतर भारताच्या नकाशावर आला तो म्हणजे गुन्हेगारीच्या क्षेत्रात खूप मोठं नाव बीडचं झालं मात्र संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर बीड जिल्ह्यातील गँगवर संपता संपत नाही. तोच आता बीड जिल्ह्यामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये मोठी खळबळ उडाली आणि याच खळबळी मध्ये मात्र आता एका खाजगी क्लासेसमध्ये नामांकित शहरांमध्ये शाहूनगर मध्ये असलेली

▶ पान २ वर






## त्या नराधम प्राध्यापकाच्या तोंडाला काळं फासणार, गाढवावरून धिंड काढणार

### शिवसेनेचे जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांचा इशारा

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील उमा करण कोचिंग क्लासेस मधील प्रा.विजय पवार व प्रशांत खाटोकर या दोघांनी क्लासेस मधीलच एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून त्या दोघांवर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल होताच ते दोघेही फरार झाले असून पोलिसांची चार पथके शोध घेत आहेत.

या निंदनीय प्रकरणाचे सर्व स्तरातून निषेध होत असून पालकांच्या व सामाजिक कार्यकर्त्यांच्या संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध करून शिक्षकी पेशाला काळिंबा फासणाऱ्या त्या नराधम प्राध्यापकाची गाढवावरून धिंड काढणार असल्याचे सांगितले. तसेच त्या क्लास मधील इतर मुलीवर अत्याचार झाल्याचा संशय व्यक्त करत मुलींनी घाबरून न जाता पोलिस ठाण्यात तक्रार करावी असे आवाहन करण्यात आले.

# विजय पवार संदीप क्षीरसागरांचा राईट हॅन्ड, घटनेनंतर रात्री आमदाराच्या घरी, फोन कॉलही गेले

## बीड लैंगिक छळाप्रकरणी योगेश क्षीरसागरांचा गंभीर आरोप

बीड । प्रतिनिधी

बीडमधील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळाचे पडसाद आता संपूर्ण जिल्हाभर उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनांनी शैक्षणिक बंद पुकारला आहे. विजय पवार संदीप क्षीरसागरांचा राईट हॅन्ड, घटनेनंतर रात्री आमदाराच्या घरी, फोनकॉलही गेले, बीड लैंगिक छळाप्रकरणी योगेश क्षीरसागरांचा गंभीर आरोप बीड जिल्ह्यात खाजगी

▶ पान २ वर




## महिला आयोगानेही घेतली दखल

अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाची प्रसार माध्यमांवर झळकलेली बातमी पाहून राज्य महिला आयोगाने तात्काळ दखल घेतली. उमा किरण क्लासेस मधील दोन प्राध्यापकांवर गंभीर आरोप असून हे प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याचा आयोगाने नमूद केला आहे. आरोप निश्चित होईपर्यंत क्लासेसची इमारत सील ठेवावी. सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घ्यावं व फरार आरोपींचा शोध घ्यावा असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. इतर विद्यार्थ्यांच्या तक्रारींची ही नोंद घ्यावी अशा सूचना महिला आयोगाने केल्या आहेत. याप्रकरणी चौकशी करून कार्यवाहीचा अहवाल तात्काळ ईमेलद्वारे सादर करण्याचा आदेशही प्रशासनाला देण्यात आले आहेत.

## मुलींनो, पुढे या, तक्रार द्या?

यापूर्वीही अशाप्रकारे कोणाचा छळ झाला असेल किंवा त्रास दिला असेल तर मुलींनी पुढे येऊन सांगावे. मुली घाबरत असतील तर पालकांनी यावे. आम्ही महिला कर्मचाऱ्यांमार्फत आधार देऊन वस्तूस्थिती समजून घेऊ. मुलींची तक्रार घेऊन चौकशी करून कारवाई केली करू, असे पिंक पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक मनोजकुमार लांडगे यांनी सांगितले.

## विजय पवारचे नेत्यांसोबतचे फोटो व्हायरल!

विजय पवार याने मागील काही दिवसांत शिक्षण क्षेत्राच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची माया जमवली आहे. तो प्रोफेशनल खासगी क्लासेस चालवतो. शिवाय, त्याच्या इंग्लिश स्कूलही आहेत. त्याचे राजकीय नेत्यांसोबत नियमित उठ–बस असते. या घटनेनंतर त्याचे राजकीय नेते, प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ते आदींसोबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. हेच फोटो पाहून अनेकदा पालक, विद्यार्थी शांत बसत होते, अशी चर्चा ऐकायला मिळत आहे.

## विद्यार्थ्यांचे पैसे परत करा?

खासगी क्लासमध्ये मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे हे क्लास बंद करून आमच्या मुलांची फीस परत करा, अशा प्रतिक्रिया काही पालकांनी व्यक्त केल्या. केवळ पवारच नव्हे इतर ठिकाणी तरी आमची मुले सुरक्षित राहतील, याची हमी काय, असा सवाल पालकांनी उपस्थित केला. त्यामुळे या सर्वच क्लासला कुलूप लावा, अशा संतप्त भावना ऐकायला मिळत आहे.

## राजकीय पुढारी गप्प का?

या प्रकरणात एकाही राजकीय नेत्याने अद्यापर्यंत अधिकृतपणे पुढे येऊन प्रतिक्रिया दिली नाही. दोन्ही आरोपी मोकाट आहेत. पीडिता आणि तिचे कुटुंब दहशतीखाली आहे. एरव्ही किरकोळ कारणांवरून आवाज उठविणारे राजकीय नेते या प्रकरणात गप्प का? असा प्रश्न आहे.

## पोलिसांनी मुसक्या आवळाव्यात



शैक्षणिक क्षेत्राला काळीमा फासणाऱ्या विजय पवार नावाचा व्यक्ति जो स्वतःला स्वयंघोषित एक आदर्श शिक्षक एक गुरु म्हणून घेणारा ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल चा संस्था चालक, या हरामखोराने क्लासेस च्या नावाखाली नियतीलाही लाजवेल अशे कृत्य नाबालिक मुली सोबत असील चाळे करून गुरु नावाला कलंक लावला आहे, अशा नीच प्रवृत्तीच्या मानसिकतेने पछाडलेल्या मनोरुग्णाला मोठमोठे राजकीय पुढार्यांनी जर शह दिला तर त्यांना देखील मुली आई बहीण आहेत याची त्यांना जाणीव असावी. संबंध पोलीस प्रशासनाने या हरामखोराला वेळीच अटक करून त्याच्या मुस्क्या आवळाव्यात असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवइ गटाचे बीड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काकडे यांनी केले आहे.

# सर्वसामान्य नागरिकांना सुविधा पुरविण्यासाठी नगर परिषदेने तत्पर रहावे : अमरसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

नगरपरिषदे सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी काम करत असते नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत तसेच व्यापारी वर्गाला देखील सुविधा मिळाल्या पाहिजेत हाच हेतू ठेवून नगरपरिषद काम करत असते. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कसलेही राजकारण न करता सर्वसामान्यांच्या आणि व्यापारी वर्गाच्या सेवेसाठी तत्पर राहावे असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. गेवराई नगर परिषदेच्या वतीने विविध विकासकामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते.




गेवराई शहरामध्ये नगर परिषदेच्या वतीने रुपये १ कोटी ५० लक्ष रुपये किंमतीच्या व्यापारी संकुल बांधकामाचा तसेच नविन बसस्थानक ते चार्वाक हॉटेल पर्यंत सिमेंट कॉक्रिट नाली बांधकामाचा शुभारंभ जयभवानी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला. यावेळी भवानी बँकेचे चअरमन बप्पासाहेब मोटे, माजी नगराध्यक्ष विनोद सौंदरमल, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, माजी नगरसेवक जालिंदर पिसाळ, राधेशाम येवले, कृष्णा मुळे, मंजुर बागवान, विलास सुतार, आवेज शरीफ, सय्यद नजीब, उत्तमराव सोलाने, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, संजय पुरणपोळे, बंटी सौंदरमल, धमपाल भोले, ॲड. योगेश पाटील, ॲड. गौतम कांडेकर, ॲड. मनोज हजारे, दत्ता दाभाडे, संतोष आंधळे, मानवी हक्क अभियानचे कडुदास कांबळे, मोहसिन बागवान, सुभान शेख, सुभाष गुंजाळ, विलास ठाकुर, दत्ता लाड, संतोष सुतार, वसीम फारोकी, जे.के. बाबुभाई, अक्षय पवार, संदिप मडके, रजनी सुतार, बाबा शेख, राजाभाऊ जवंजाळ, कमलाकर हातागळे, दादासाहेब चौधरी, खालेद कुरेशी, सतिष दाभाडे, विलास निकम, सुनिल सुतार, शाम सुतार, नविद मशायक, सादेक शेख, बाळराजे सोनकांबळे, अन्सारी आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पूढे बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, गेवराईशहराचे अर्थकारण मजबुत करण्यासाठी शहराला जोडणारे रस्ते झाले पाहिजेत. गेवराई शहराच्या प्रत्येक भागाचा विकास झाला पाहिजे असेही ते यावेळी म्हणाले.

# रेवकी गावात ११०० ब्रास वाळू चोरी! तहसीलदार खोमणेंवर संगनमताचा आरोप?

## तक्रारदार शांम रोकडेंना माझा पाहुणा मंत्री दत्ता मामा भरणे रातोरात गायब करेल तहसीलदार खोमणे यांनी दिली धमकी?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील रेवकी गावात ११०० ब्रास वाळू चोरी प्रकरणाने खळबळ उडाली आहे. स्थानिक नागरिक शाम गणेश रोकडे यांनी थेट तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावर संगनमताने वाळू चोरीचा आरोप करत जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे. या प्रकरणी तातडीने निलंबनाची कार्यवाही न झाल्यास पालकमंत्री अजित पवार यांच्या समोर आत्मदहन करण्याची धमकी रोकडे यांनी दिली आहे.



रोकडे यांच्या अर्जानुसार, रेवकी येथील ११०० ब्रास वाळूचा शासकीय पंचनामा झाला असताना तहसीलदार खोमणे यांच्या सहकार्याने ही वाळू गायब झाली. खोमणे यांना विचारणा केल्यास त्यांनी उर्मटपणे, ही वाळू तुझ्या बापाची आहे का? असे म्हणत रोकडेंना कार्यालयातून हाकलून दिले. एवढेच नव्हे, तर माझे पाहुणे दत्ता मामा भरणे मंत्री आहेत, ते तुला रातोरात गायब करतील, अशी धमकीही दिली. या प्रकरणाने बीड जिल्ह्यातील वाळू माफियांचे बस्तान उघड झाले आहे. तहसीलदारांसारख्या जबाबदार अधिकाऱ्याचाच चोरीत सहभाग असेल, तर सामान्य नागरिकांचे काय? रोकडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह मुख्यमंत्री, महसूलमंत्री, विभागीय आयुक्तांना पत्र पाठवून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. वाळू चोरीच्या या काळ्या कारनाम्याने प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तहसीलदारांवर कारवाई होणार की रोकडेंना न्याय मिळणार? हा प्रश्न अनुत्तरित आहे!

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या स्वप्नातील ग्रीन परळीसाठी महिला सरसावल्या



परळी । प्रतिनिधी

हरित परळी, सुंदर परळी हा उद्देश समोर ठेवत पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी खा.प्रीतमताई मुंडे यांच्या स्वप्नातील ग्रीन परळीचे स्वप्न साकार करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली परळी शहरात वृक्ष लागवडीची मोहिम राबविण्यात येत असुन या मोहिमेत महिलांचा लक्षणीय सहभाग आहे.

ना. पंकजाताई मुंडे व खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण रक्षणासाठी वैद्यनाथ मंदिराच्या पाठीमागे वेताळ मंदिराच्या जवळील मेरुगिरी प्रदक्षिणा मार्गाच्या बाजुने गुरुवार दि.२६ जुन रोजी वृक्षारोपण करण्यात आल्यानंतर शुक्रवार दि.२७ जुन रोजी परळी शहरातील विविध रस्त्यावर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी राणी लक्ष्मीबाई टॉवर परिसरात महिलांनी वृक्ष दिंडी काढत वृक्ष लागवडीचा संदेश दिला. या मोहिमेत वेगवेगळ्या जातीच्या ४,५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षलागवड मोहिमेत भाजपाचे डॉ.शालिनीताई कराड, राजेंद्र ओझा, महादेव इटके, बंडू नाना कोरे, दिलीप नेहरकर, रमेश गायकवाड, विकास हलगे, श्रीनिवास राऊत, बाळू फुले, शिवाजीराव ठोंबरे, चंदाताई ठोंबरे, नंदा पुरभूज, सारिका कुरील, श्रीमती तारामती अग्रवाल, सौ सुरेखा मंत्री, विजयाताई दहिवाळ, चित्राताई देशपांडे, सुनितााताई बोडके, वैशालीताई चिद्रेवार, सौ मंगल देवशेटवार, सुलभा रुद्रवार, अर्चना रुद्रवार, सुरेखाताई मंत्री, सुनंदा निर्मळे, स्वातीताई चाटे, कीर्तीताई झंवर, मनीषाताई चौंडे, अंजूताई ओपळे, छायाताई ओपळे, तसेच परळी शहरातील प्रसिद्ध डॉक्टर सौ. वैशाली गंजेवार, डॉक्टर प्रज्ञा मुंडे, डॉक्टर पूजा तोतला, सरला उपाध्याय, डॉक्टर अर्चना मिसाळ, सोनम डॉक्टर सोनम जाजू, डॉक्टर देवशाला घुगे, डॉ.माया समशेट्टी, डॉ. हर्षा भायेकर, डॉ.सारिका घुगे, डॉ.सुनिता झंवर, सौ मंगल भोईटे, राजकन्या बंग, जनाताई पासेवार, सौ.रिया शेटे, सुजाता गडम, शालिनी बोधे, शांता स्वामी, अनुराधा मोदानी यांच्यासह परळी शहरातील विविध क्षेत्रातील महिला, सामाजिक कार्यकर्त्या, डॉक्टर मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# जिल्हातील सर्व खाजगी क्लासेस मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे स्वाती कातखडे यांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी



बीड शहरातील उमाकिरण नावाच्या खाजगी क्लासमध्ये शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीच्या सातत्याने लैंगिक छळ झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, पालकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या गंभीर प्रकरणी सावता सेनेच्या बीड जिल्हा अध्यक्षा सौ. स्वातीताई कातखडे यांनी तीव्र संताप व्यक्त करत तत्काळ आरोपींना अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी जोरदार मागणी केली आहे. स्वातीताईंनी म्हटले की, अशा विकृत प्रवृत्तीमुळे निष्पाप मुलींचे बालपण उद्ध्वस्त होत आहे. त्यामुळे अशा घटनांना आळा बसावा यासाठी कठोर कारवाई आणि त्वरित न्याय आवश्यक आहे. तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व खाजगी क्लासेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात यावे, अशीही मागणी सावता सेनेच्या महिला बीड जिल्हाध्यक्षा स्वातीताई कातखडे यांनी केली आहे.

# मंडळस्तरावर तहसीलचे पथक डिबीटीसाठी आल्याने जेष्ठ नागरिकांचे तहसीलचे हेलपाटे वाचले

## चौसाळा येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर व महाराजस्व अभियान उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

शुक्रवार २७ जून रोजी बीड तालुक्यातील चौसाळा येथे महाराष्ट्र शासनाच्या महाराजस्व अभियानांतर्गत बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेशाने, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबवण्यात आले. या कार्यक्रमाला मंडळ अधिकारी देविदास जायभाय, ग्राम महसूल अधिकारी शिवराम येवले, कमलेश निर्मळ, अश्विनी अनकर, निशा खांडेकर, शेख गफूर यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.




या अभियानाअंतर्गत शेतकरी खातेदार यांना शेतकरी ओळखप्रमाणपत्र (फार्मर आयडी) चे महत्त्व समजावून सांगितले तसेच त्यांना ते काढून वितरीत करण्यात आले. जिवंत सातबारा मोहीम टप्पा-२ अंतर्गत या अभियानातून विविध योजना जसे की, वारस नोंदी, अपाक शेरा कमी करणे, एकुम नोंद कमी करणे, तगाई बोजा नोंद कमी करणे, कालबाह्य नोंदी कमी करणे, भोगवटादार वर्ग १ व २ नोंदी वेगळ्या करणे इत्यादी बाबत माहिती देण्यात आली. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजनेंतर्गत सर्व लाभार्थींचे डी बी टी द्वारे मानधन वितरीत होणार आहे. यावेळी चौसाळा सर्कल अंतर्गत संपूर्ण गावातील उपस्थित लाभार्थी यांचे डी बी टी कामकाज करण्यात आले. यावेळी संगायो व श्रावण बाळ योजनेच्या ३११ लाभार्थी यांचे डी बी टी करण्यात आले असे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कळवले आहे.

यावेळी शेतकरी यांना रस्त्याचे महत्त्व समजावून सांगताना नकाशावरील रस्ते खुले करणे, त्याच्या नोंदी सातबारावर घेण्याकरीता ग्राम महसूल अधिकारी यांना शेतकरी यांनी मदत करणे, पी.एम किसान योजना, जन्म-मृत्यू दाखले, पुरवठा विभागाची कामे, फेरफार नोंदी बाबत अडचणीचे निराकरण करण्यात आले. मंडळ अधिकारी देविदास जायभाय यांनी चौसाळा सर्कल अंतर्गत उपस्थित ग्रामस्थाचे समाधान पूर्वक शंका निरसन करून मोलाचे मार्गदर्शन केले.

जिवंत सातबारा मोहीमेंतर्गत मृत शेतकरी खातेदाराच्या वारसांना शेतजमिनीशी संबधित योजनाचे फायदे सहज व वेगाने मिळावेत यासाठी जिवंत सातबारा मोहीम टप्पा-२ चे महत्त्व अगदी सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आले. या शिबिरास चौसाळा गावाचे सरपंच बाबूशेट लोढा, उपसरपंच अंकुश कळासे, हिंगणी बु. चे उपसरपंच अंकुश गोरे, पालसिंगनचे सरपंच समाधान झांबरे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी तेसाठी चौसाळा सर्कल मधील मंडळ अधिकारी तसेच सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.





# हातात भाजीची टोपली, मनात माणुसकीचा प्रकाश!

## गल्लोगल्ली भाजी विकून उपजीविका करणाऱ्या तरुणाची समाजासमोर एक वेगळीच प्रेरणा

आजच्या भौतिक आणि स्वार्थाच्या युगात जेव्हा मोठमोठ्या श्रीमंतांनी समाजापासून तोंड फिरवले आहे, तेव्हा एका साध्या हातगाडीवर भाजी विकणाऱ्या कपिलेश्वर चंद्रकांत हादगुले या तरुणाने दाखवलेली माणुसकी समाजाला जागवणारी ठरत आहे. कपिलेश्वरने सहारा अनाथालयातील एका निराधार चिमुरडीला दत्तक घेतले असून, तिचे पालकत्व स्वीकारून समाजासमोर एक वेगळीच प्रेरणादायी मिसाल ठेवल्याचे कौतुक होत आहे.

हातात फारसा पैसा नाही, ना कुठला डागडुजीचा व्यवसाय... फक्त गल्लो-गल्लीत फिरत हातगाडीवर भाजी विकून उदरनिर्वाह करणारा कपिलेश्वर दर महिन्याच्या २० तारखेला संध्या या दत्तक घेतलेल्या चिमुकलीसह सहारा अनाथालयात अन्नदान करतो.

कपिलेश्वर सांगतो, मोठे असल्याने मदत करणे हे ठरलेच, पण मी छोटा असूनही जर कोणाचं जीवन थोडंसं सुखद करू शकलो, तर त्याहून मोठं समाधान काही नाही. या एका कृतीमधून समाजाला हे शिकवायला मिळते की, माणुसकी आणि आपुलकीसाठी भरघोस पैसा लागतोच असं नाही. मोठमोठे गाड्या, बंगले असणाऱ्यांना जे सुचत नाही, ते भाजी विकणाऱ्या कपिलेश्वरने करून दाखवलं आहे.

### समाजासाठी एक प्रकाशवाट

कपिलेश्वरसारख्या युवकांनी दिलेल्या प्रेरणेतून समाजात अजूनही माणुसकी जिवंत आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. गरीब असूनही मोठं मन असावं लागते, हे दाखवणारा कपिलेश्वर हादगुले समाजासाठी खरंच एक प्रकाशवाट आहे.

### पैसे नाहीत, पण मन मोठं असायला हवं!

सहारा अनाथलयाचे संचालक संतोष गर्जे यांनी सांगितलं की, कपिलेश्वर हा नियमित येतो कुठलीही गाजावाजा नाही. साधा नम्र आणि प्रेमळ. कपिलेश्वरसारख्या दात्यांमुळेच आम्ही आजवर अनेक अनाथांचं आयुष्य बदलू शकलो.

**-संतोष गर्जे,** सहारा अनाथलयाचे संचालक

### कपिलेश्वरने 'संध्या ' ला पहिल्या पाहिलं, तेव्हा ती शांत, कोपऱ्यात बसलेली, डोळ्यांत डोळ्यात प्रश्न घेऊन बघणारी चिमुकली होती तो क्षणच तिच्या आयुष्याचा वळण बिंदू ठरला

ती डोळ्यात बघत होती. कोणीतरी तिला हात देईल याची वाट पाहत होती तेव्हाच ठरवलं या पोरगीचं आयुष्य मी उजळवणार असं सांगताना कपिलेश्वरचा गळा भरून येतो. आज भाजी विकून मिळवला पैसा तिच्या ड्रेसवर खर्च करतो आणि मला वाटतं मी जग जिंकलो एक दिवसाची कमाई कधी ३०० कधी ५०० रुपये होते त्यातूनच आता मी तिच्या शिक्षणाचा खर्च आता उचलणार आहे दिवसभरात उन्हात फिरतो ती मोठी होऊन स्वतःच्या पायावर उभी राहील तर मी खूप काही मिळवण्याचा सारखं मला वाटेल असे ही कपिलेश्वर सांगतो, हा एक माणूसकीचा असून भटक्या श्वानाला सुध्दा रोज ५० रूपयांचे बिस्कीट खाऊ घालतो खरंच श्रीमंतांना शिकवणारा गरिबांचा हिरा म्हणजे कपिलेश्वर आहे.

पान १ वरून...

## बेंबीच्या देठापासून ओरडणाऱ्यांनो लेकीच्या अब्रूचं तुम्हाला काही देणं-घेणं नाही का?

उमाकिरण हॉल या बिल्डिंगमध्ये मात्र एका विद्यार्थिनी वरच लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली अत्याचार घडत असताना बीड जिल्ह्यामध्ये इंग्लिश स्कूलच्या नावाचं मोठं नाव असलेले ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूलचा संचालक नराधम विजय पवार व शिक्षक खटावकर या दोघांनी संबंधित मुलीवर अन्याय केल्याचं प्रकरण समोर आलं संबंधित मुलीने पीडित चिमुकलेने पोलीस स्टेशन मध्ये कशाप्रकारे शोषण झालं याचा फिर्यादीमध्ये सांगताना सुद्धा व फिर्याद लिहिताना सुद्धा पोलीस अधिकारी कर्मचारी यांचे हा भाव पाहून अनेकांना खूप मोठे दुःख झाले स्वतःच्या पुढच्या लेकराप्रमाणे जपणाऱ्या याच मास्तरांनी मात्र या मुलीला कशाप्रकारे लैंगिक खेळ केला हे पाहून पोलीस प्रशासनाचे डोळ्यात पाणी आलं परंतु, आता या ठिकाणी बीड जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या पक्ष संघटनांनी ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलचा संचालक व उमाकिरण हॉल येथील खाजगी क्लास सेंटर म्हणजेच तो नराधम विजय पवार जो की या क्लासेसमध्ये लाखोंची फिस घेऊन कोट्यावधी रुपया जमा करत होता. त्यानेच या मुलीचं लैंगिक शोषण केलं आणि शिवाजीनगर पोलीस स्टेशन या ठिकाणी संबंधित पीडित मुलीने काल म्हणजेच जवळपास ४८ तास होत आहेत तक्रार देऊन परंतु आरोपीच्या तपासासाठी बीडमधून तीन ते चार पथके रवाना केले असल्याची माहिती मिळत आहे. संबंधित पोलीस पथक हे तीन ते चार आहेत परंतु अजूनही अद्याप पाठीचे स्वतः असून जात असताना संबंधित आरोपी नराधम सापडले का नाही असा समाजात यांना करत आहे. याच प्रकरणांमध्ये आता बीड जिल्ह्यामध्ये थोडी जरी काही खालीवर घटना घडली तर या घटनेला मात्र सामाजिक कार्यकर्ते अंजली दमानिया भाजपचे आमदार सुरेश धस, मनोज जरांगे पाटील, लक्ष्मण हाके हे बेबीच्या देठापासून ओरडत होते. आणि ओरडत आहेत परंतु एका लेकीच्या इज्जतीसाठी तिच्या अब्रूची लक्तरे विषय टांगल्यानंतर सुद्धा याच काही कसं वाटत नसेल याच राजकीय नेत्यांना व जे स्वतः सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांना आता काही पडलं नाही का असा सवाल आता या ठिकाणी उपस्थित होत आहे. त्यामुळे आता तरी आरोपीला कधी अटक होते याचे उत्तर कमीत कमी पोलीस प्रशासनाकडून मिळणे अपेक्षित आहे असं जनतेला वाटत आहे.

बीड शहरातील पांगरी रोडवर आदर्शनगर भागात उमाकिरण शैक्षणिक संकुल आहे. एकाच छताखाली फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी, मॅथ असे विषय शिकवले जातात. याचे वेगवेगळे संचालक आहेत. विजय पवार हा फिजिक्सचा संचालक आहे. त्याच्याकडेच प्रशांत खाटोकर हा शिक्षक होता. पवार हा केवळ आर्थिक व्यवहार पहात असे. याच दोघांनी मिळून १७ वर्षाच्या विद्यार्थिनीचा एक वर्षभर वारंवार लैंगिक छळ केला. तिला बॅड टच करत तिचे नग्न करून फोटो मोबाइलमध्ये काढले. या घटनेत गुरुवारी रात्री गुन्हा दाखल होताच जिल्हाभरात याचे पडसाद उमटले. या घटनेचा निषेध नोंदविण्यासह आरोपींच्या अटकेसाठी आंदोलनेही झाली. काहींनी अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांचीही भेट घेतली होती. त्यांनी आरोपी शिक्षकांच्या शोधासाठी तीन पथके तैनात केल्याचे सांगून लवकरच त्यांना अटक करू, असे अश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## विजय पवार संदीप क्षीरसागरांचा राईट हॅन्ड,

कोचिंग क्लासमध्ये नीटची तयारी करणाऱ्या एका १७ वर्षीय मुलीच्या लैंगिक छळ आणि छेडछाड प्रकरणाने पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे.

विजय पवार आणि प्रशांत खाटोकर असे या दोन शिक्षकांचे नाव असून या दोन्ही शिक्षकांविरोधात फॉक्स अंतर्गत बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. बीडमधील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळाचे पडसाद आता संपूर्ण जिल्हाभर उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनांनी शैक्षणिक बंद पुकारला आहे. अल्पवयीन मुलीच्या छळ प्रकरणातील आरोपी शिक्षक विजय पवार याला राजकीय पाठबळ असून आमदार संदीप क्षीरसागर यांचा तो राईट हॅन्ड असल्याचा आरोप संदीप क्षीरसागर यांचे भाऊ व अजित पवार गटाचे नेते योगेश क्षीरसागर यांनी केला.

घटनेच्या निषेधार्थ बीडमधील कोचिंग क्लासेस बंद ठेवण्यात आले असून कोचिंग क्लासेस परिसरात पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. मुलीच्या फिर्यादीवरून दोन्ही शिक्षकांवर पोस्को अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत असून दोन्ही शिक्षक अद्याप फरार आहे. पोलिसांनी आरोपी शिक्षकांच्या अटकेसाठी विशेष पथक रवाना केले आहे.

### विजय पवारला राजकीय पाठबळ

मागील दोन वर्षात बीड वेगळा वळणावर असताना ही घटना शिक्षणक्षेत्राला काळीमा फासणारी आहे. ही घटना झाल्यानंतर यातील शिक्षक रात्री लोकप्रतिनिधींच्या घरी होता आणि त्या ठिकाणाहून यंत्रणेला फोन देखील केला. यातील फराळ आरोपी अजून का पकडले गेले नाही त्याचा तपास कोणा गरजेच कोणा कोणाचा दबाव आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला? ज्या लोकांसोबत हे शिक्षक राहतात त्यांच्याकडून कितपत पाठिंबा त्यांना दिला गेला आहे हे शोधून काढणे गरजेचे आहे.

विजय पवार हा शिक्षण क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून आहे. लहान मोठ्या क्लासेस इथे येऊ नयेत यासाठी मोठा दबाव तंत्र त्यांना वापरलं. अनेक जमीन घोटाळ्यात शिक्षण पवार सामील असून कोट्यवधी रुपयांची माया त्याने जमा केली आहे. त्यातून येथील राजकारण सुरू असल्याचं योगेश क्षीरसागर यांनी म्हटलं. आरोपी विजय पवार विद्यमान आमदारांचे राईट हॅन्ड असल्यासारखे आहेत. घटनेनंतर ते आमदारांच्या घरी गेलेत रात्री. याचा तपास व्हायला पाहिजे. यांचे कुठे कुठे फोन कॉल गेलेत? कुठून दबाव आणण्याचा प्रयत्न केला गेला? इतक्या गंभीर गुन्ह्यामध्ये आरोपी फरार राहतोच कसा? याचा तपास घेतला पाहिजे. असेही ते म्हणाले.

# बीड जिल्ह्यात गाई आणि ताई सुरक्षित नसल्यामुळेच एसपी नवनीत कॉवत साहेब गाईला व ताईंना वाचवणाऱ्या लेकराला खोट्या गुन्ह्यांत अडकवले

## आष्टीच्या पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांनी गोहत्या होण्यासाठी कसयांना दिले समर्थन! महायुतीच्या सत्तेचा राज्यात गोरक्षक धोक्यात

### निस्वार्थ भावनेने गोमातेची सेवा करणाऱ्यांचे कार्य थांबवण्याचा डाव

### गोमातेची सेवा करण्यासाठी स्वत:चे प्राण धोक्यात घालून गोरक्षणाचे कार्य करणाऱ्या सेवकावर हल्ला

### गोरक्षकांवर झालेल्या प्राण घातक हल्ला जिल्हाभरात हळहळ व्यक्त

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यातील खडकत या गावात दररोज शंभर देशी गोवंशाची कत्तल अनधिकृत कत्तलखान्यात करून बेकायदेशीर पद्धतीने गोमास वाहतूक करून विक्री करत होत असल्याची माहिती गोरक्षकांना मिळाली होती. हे थांबवण्यासाठी गोरक्ष निस्वार्थ पणाने देव देश धर्माचे आणि गोमातेची सेवा करण्यासाठी स्वत:चे प्राण धोक्यात घालून गोरक्षणाचे कार्य करत आहेत. दि.१३ जून रोजी दुपारी खडकत आष्टी रोडवर बेकादेशीर पद्धतीने कत्तलीसाठी गोवंश घेऊन चाललेले जितो टेम्पो गाडी क्रमांक चक२३ –ण५०६९ याला गोरक्षकांनी रस्त्यात अडविली असता. गाडीच्या हौदामध्ये पहिले असतात त्यात दोन गाई व चार छोटे छोटे बासरे निर्दयतेने बांधून दिसल्याने ११२ या नंबर वर कॉल करायचा आधी ड्रायव्हरने स्थानिक कासायांना कॉल करून बोलावली त्यानंतर खडकत गावातील अंजुम कुरेशी, सादाब कुरेशी, साकिब कुरेश, अबताप कुरेशी, तोफिक कुरेशी, इफ्तेगार कुरेशी, सोहेल ताहेर कुरेशी, मुहम्मद कुरेशी, असे आठ इस जणांनी गोरक्षकांवर प्राण घातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला व म्हणाले की पुन्हा जर गाडी अडवण्याचा प्रयत्न केला तर गाडी खाली घालून जीवे मारून टाकू, असे हल्ले जर गोरक्षणावर होत असेल तर याचा अर्थ असा आहे की कसाही कायदा हातात घेऊन काम करत आहे. आणि त्यांना आष्टी तालुका पोलीस प्रशासन पाठबळ देत असल्याचे गोरक्षकांकडून सांगण्यात येत आहे. आष्टी तालुका पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक शरद भुतेकर आणि खडकत गावचे बीट अंमलदार शिरसागर दादा हे गो हत्या होण्यासाठी कसायांना समर्थन करत आहे. आणि प्रमाणिक गोरक्षकावर खोटा गुन्हा दाखल करून त्यांचे आर्थिक नुकसान करून गोरक्षकांचे कार्य बंद पाडण्याचे काम आष्टी तालुका पोलीस प्रशासन करत आहे.



## स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे यांच्या पुण्यस्मरणार्थ पहिली ते सातवी च्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक घेणार दत्तक : ॲड. मोरे



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वडगाव कळसंबर येथील भूमिपुत्र आणि बीड बालाघाटावरील पहिले एस.टी.आय. अधिकारी स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे यांच्या पाहिले पुण्यस्मरणार्थ वडगाव कळसंबर चे सरपंच सुशाला आसाराम मोरे यांनी तसेच मोरे कुटुंबियांनी पहिली ते सातवी च्या जिल्हा परिषद शाळा वडगाव (क)च्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षिणक दत्तक घेणार असल्याचे ॲड. गणेश मोरे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे म्हटले आहे.

स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे यांना सामाजिक कार्याची सतत आवड होती. ते बालाघाटावरील पाहिले एस.टी.आय. अधिकारी होते. औरंगाबाद विद्यापीठात स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे हे एम.ए. पोल्टिकल सायन्स गोल्ड मेडलिल्स्ट होते. तसेच तत्कालीन एम.पी.एस.सी. परीक्षेत ते महाराष्ट्रात पहिले आले होते. मुरलीधर विठ्ठल मोरे बालाघाटावरील पहिले सुपर क्लास वन अधिकारी होते. त्यांच्या कार्यकिर्तीमध्ये त्यांना राज्य शासनाकडून उत्कृष्ट कार्यकेल्या बद्दल पुरस्कार देण्यात आलेला होता. त्या काळात स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे राज्यामध्ये पहिले आले असल्याने त्यांचा अनेक विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा या करिता हा संकल्प ॲड गणेश मोरे यांनी राबवण्याचे ठरवले आहे. त्यांनी अनेक वेगवेगळ्या ठिकाणी सेल टॅक्स ऑफिसर म्हणून अतिशय चांगल्या प्रकारे आपले कर्तव्य बजावले होते. स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे यांचे मागील वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचा पुतण्या सामाजिक आणि शैक्षणिक कामात अग्रेसर आहेत. आपल्या चुलत्यांचा आदर्श घेत ॲड. गणेश मोरे यांनी पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षिणक दत्तक घेण्याचे ठरवले आहे.

**स्व. मुरलीधर मोरे यांना राजकारणाची सुद्धा आवड होती**

स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे यांना राजकारणाची आवड होती. मुरलीधर विठ्ठल मोरे हे १५ वर्ष वडगाव सेवा सहकारी सोसायटी चे बिनविरोध चेअरमन होते. ते हयात असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. गणेश मोरे यांनी वडगाव ग्रामपंचायत निवडणूक लढवली आणि परिसरात कमी वयाचा सरपंच म्हणून जनतेतून ॲड. गणेश मोरे हे निवडून आले होते. आणि आता ॲड. गणेश मोरे यांच्या मातोश्री सुशाला आसाराम मोरे या वडगाव कळसंबर येथील विद्यमान सरपंच म्हणून कार्यरत आहेत. एका नवा आदर्श निर्माण करण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक दत्तक घेण्याचे ठरवले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर विकास विभागातील किमान वेतनाला फुटले पाय

### १५ वर्षांपासून कामगार किमान वेतनापासून वंचित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी दखल : जोगदंड

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद/ नगरपंचायत आस्थापनेतील घनकचरा व्यवस्थापनातील किमान वेतनाला पाय फुटले असून, जिल्ह्यात १५ वर्षांपासून कंत्राटी कामगार किमान वेतना पासून वंचित असल्याने येथील किमान वेतन गेले कुठे. असा प्रश्न कामगार नेते भाई गौतम आगळे सर यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी गांभीर्यपूर्वक दखल घेऊन पाय फुटलेल्या किमान वेतनाची चौकशी करून जिल्यातील मागील सर्व किमान वेतनातील फरका सह यापुढे नियमित किमान वेतन कायद्यानुसार वेतन, व इतर सोयी सवलती अदा करण्यात यावीत. अन्यथा यासाठी कामगारांना सोबत घेऊन अर्ध नग्न आंदोलन दिनांक ३० जून २०२५ रोजी करण्यात येईल, असा इशारा रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी दिला आहे.



या प्रसिध्दिस दिलेल्या पत्रकात मराठवाडा अध्यक्ष तथा कामगार प्रतिनिधी भाई राजेशकुमार जोगदंड यांनी म्हटले की, बीड जिल्ह्यातील नगरपरिषद /नगरपंचायत आस्थापनेतील कामगार पुरवठा करणारे कंत्राटदार / एजन्सी कंत्राटी कामगारांना मागील १५ वर्षांपासून किमान वेतन कायद्यानुसार वेतन देत नाहीत, बाकी सोयी सवलती सुद्धा गायप होत असून, ते कुठे जात आहेत हे कंत्राटी कामगारांना आजतागायत माहितच होत नाही. यामुळे जिल्ह्यातील कंत्राटी कामगार १५ वर्षांपासून किमान वेतना पासून वंचित आहेत. याबाबत रोजंदारी मजदुर सेना या संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर अनेक वर्षापासून आंदोलन करून किमान वेतन कायद्यानुसार वेतन का मिळत नाही याची विचारणा करतात. तेव्हा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त बैठक घेऊन जिल्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत यांना निर्देश देतात. परंतु संबंधित मुख्याधिकारी सफाईदारपणे दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे प्रत्येक महिन्याचे जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांचे वेतन कुठे जाते. असा प्रश्न कंत्राटी कामगार उपस्थित करत आहेत.

या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर विकास विभाग दुर्लक्ष करत असल्याने आता जिल्हा सह आयुक्त यांनीच गंभीर दखल घेऊन, जिल्ह्यातील किमान वेतन नेमके जाते कुठे याचा शोध घेऊन, येथील कंत्राटी कामगारांना पुढील महिन्यापासून नियमित किमान वेतन कायद्यानुसार वेतन व इतर सोयी सवलती देण्यात याव्यात यासाठी भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वात सोमवार दिनांक ३० जून २०२५ रोजी कंत्राटी कामगारांना सोबत घेऊन अर्ध नग्न सत्याग्रह करण्याचा इशारा रोजंदारी मजदुर सेना मराठवाडा अध्यक्ष भाई राजेशकुमार जोगदंड यांनी दिला आहे.

## लिंबागणेश येथे महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात संपन्न

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश महसूल मंडळातील गावांसाठी महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अंतर्गत महाराजस्व समाधान शिबिर जिल्हाधिकारी विवेक जान्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. २८ शनिवार रोजी सकाळी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आयोजन करण्यात आले. प्रमुख उपस्थिती म्हणून नायब तहसीलदार आण्णासाहेब वंजारे, मंडळ अधिकारी महादेव जायभाये, ग्राम महसूल अधिकारी तलाठी लिंबागणेश गणपत पोतदार, तलाठी नारायण दराडे अंजनवती, तलाठी शेख गफुर लोणीघाट, तलाठी विपुल बनकर बेलखंडी पाटोदा, तलाठी अक्षय शिंदे बोरखेड, पुरवठा निरीक्षक श्रीराम वायभट, पुरवठा निरीक्षक संतोष मुळीक महसूल सेवक ललित काकडे आदींची



उपस्थिती होती.

तहसील कार्यालयातील महसूल विभागाच्या संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, रेशनकार्ड, अपंग नोंदणी, वारस नोंदी, विवाह नोंदणी, जाती प्रमाणपत्र, रहिवासी दाखले, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे दाखले वाटप, आधार लिंक आदि विविध सेवा पुरविण्यात आल्या. ज्या अनुदान डीबीटी यावेळी बंद पडले होते अशा लाभार्थ्यांची डीबीटी कामे पूर्ण करण्यात आली. तसेच अग्रो स्टार फेरफार अदालत, जिवंत सातबारा मोहीम, नकाशावरील रस्ते खुले करणे इत्यादी बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. मंडळ अधिकारी जायभाये आणि तलाठी गणपत पोतदार यांनी कामकाज पाहून कार्यक्रम यशस्वी केला. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, जीवन मुळे, अँड.गणेश वाणी, संतोष भोसले, शेख अझीम, संतोष वाणी, भालचंद्र वायभट, सुंदरराव येडे, जितु निर्मळ, केशव गिरे, वैजनाथ भोसले आणि डॉ.गणेश ढवळे व पत्रकार हरीओम क्षीरसागर तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, शेतकरी महिला बहुसंख्येने लाभार्थी उपस्थित होते. यावेळी डीबीटीचे काम मोठ्या प्रमाणात झाल्याबद्दल लाभार्थ्यांनी व गावकऱ्यांनी महसूल प्रशासनाचे आभार मानले.



बीड जिल्हा परिषदेचे नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्या सत्कारावेळी उपस्थित अनिल जाधवर राज्य अध्यक्ष, राज्य उपाध्यक्ष प्रकाश अहिरे, भाऊसाहेब हंगे, मच्छिंद्र राख, बीड जिल्हाध्यक्ष द.ल. वारे, सचिव हकिम मनियार, कोषाध्यक्ष संजय दराडे, उपाध्यक्ष भाऊसाहेब मिसाळ, सुर्यकांत शिंदे, अनिल गोल्हार, सोमनाथ तांदळे, अन्वर खान हे उपस्थित होते.

## उमाकिरण शिक्षण संकुल प्रकरणात SIT चौकशी करण्यात यावी : कामरान खान

बीड । प्रतिनिधी

शिक्षणाच्या मंदिरात लोक फक्त आपली मुलीच नाही तर आपली जीवपेक्षा महत्त्व असणारी इज्जत शिष्य च्या रूपात शिक्षक व गुरूकडे विश्वासाने शिक्षण घेण्यासाठी पाठवतात पण (विजयपवार)सारखे ह्या माणसाचे रूपात लपलेले निर्लज्ज राक्षसांनी आज अजून एकदा गुरू शिष्याचा हा पवित्र नातेला कलंक लावण्याचा काम उमाकिरण शिक्षण संकुल या ठिकाणी केला, असे अश्लील, निंदनीय, माफीच्या लायक नसलेला कृत्य बीडचा ह्या समाज बारदश्त करून घेणार नाही, प्रशासनांनी लवकर ते लवकर (आरोपी विजय पवारला) अटक करण्यात यावे, विशेष म्हणजे ह्या (निर्लज्ज विजय पवारनि) रिंीं मध्ये कितीक मुलींचे सोबत असा अश्लील कृत्य केला आहे?, अणि या सारखे अजून किती (राक्षस विजय पवार) शिक्षणाचे मंदिरात घात लाऊन बसलेले आहेत, आणि बीड जिल्ह्यात कोण कोणत्या शिक्षण ठिकाणी असे अश्लील कृत्य महिला व मुलींसोबत घडत आहे हे पण डखढ द्वारे निष्पन्न करण्याची गरज आज पडली आहे, भविष्यामध्ये कमित कमी आपल्या बीड जिल्ह्यात अशी घटना कोणासोबत होऊ नये यासाठी या पिसाळ कुत्र्या सारखे नीच कृत्य करणारे विरुद्ध स्पेशल चौकशी करून फास्ट ट्र्क कोर्टमध्ये, कठोर ते कठोर शिक्षा देणे अत्यंत गरजेचा आहे, तसेच आरोपी विजय पवारकडून शिक्षणाच्या नावाखाली घेतलेली षशशी चे पैसे गोरगरीब पालकांना व विद्यार्थ्यांना लवकर परत मिळाले पाहिजे.



# बीड जिल्ह्यातील तीन आंबेडकरवादी योद्ध्यांचा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मान

बीड । प्रतिनिधी

अणणा भाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मा. बा.रा. वाघमारे सर यांच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीत योगदानाबद्दल महाराष्ट्रातील ५० मान्यवरांना २६ जून २०२५ रोजी पुरस्कृत करण्यात आले. आंबेडकरवादी योद्ध्यांचा सत्कार आणि भव्य पुरस्कार वितरण सोहळा रुबी हॉटेल नवीन नांदेड सिडको येथे पार पडला. अनेक नामवंत मान्यवरांच्या हस्ते छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार सन्मानपूर्वक देण्यात आला.

बीड येथील आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे यांना त्यांच्या आंबेडकरवादी चळवळी बद्दल हा पुरस्कार देण्यात आला. महाराष्ट्रामध्ये खरी आंबेडकरी चळवळ चालवणारा ध्येयवेढा तरुण म्हणून ते परिचित आहेत. आंबेडकरवादी चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी तरुणांची एक वेगळीच सेना तयार केलेली आहे. या सेनेच्या माध्यमातून मागास, वंचित, अन्याय अत्याचारग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी वेगाने तत्पर असतात. त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान नांदेड येथील अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या माध्यमातून करण्यात आला. खऱ्या आंबेडकरवादी योद्धाचा सत्कार झाला अशी चर्चा आज महाराष्ट्रातून उमटत आहे.

त्याचप्रमाणे बीड येथील दुसरे सामाजिक कार्यकर्ते माननीय बाबूराव केशवराव गालफाडे सर यांनाही छत्रपती राजश्री शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार देण्यात आला.

बाबुराव गालफाडे सर सध्या केज येथे वास्तव्यास असून दलितांवरील अन्याय



अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात. त्यांच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात. समाजातील यशवंताचा प्रोत्साहनपर सत्कार असो, की एखाद्या अडचणीत सापडलेल्या व्यक्तीला मदत करण्याचे कार्य असो, प्रत्येक ठिकाणी त्यांचा हिरीरीने सहभाग असतो. समाजातील अनेक संघटनांचे व पक्षांचे ते सल्लागार म्हणून काम करतात. अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या माध्यमातून छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार देऊन त्यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला.

पुरस्काराचे बीडचे तिसरे मानकरी डॉ.लक्ष्मण वाघमारे यांनाही हा पुरस्कार देण्यात आला. समाजसेवा, शिक्षण, सामाजिक न्याय आणि मानवतावादी विचारांद्वारे आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आणि श्रमिक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सन्माननीय डॉ.लक्ष्मण मरीबा वाघमारे यांना हा गौरव केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण समाजाचा, कुटुंबाचा आणि महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचा सन्मान असल्याचे मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केले. हा सन्मान म्हणजे डॉ. वाघमारे यांच्या दीर्घकालीन सातत्यपूर्ण कार्याचा प्रामाणिकपणाचा, सामाजिक बांधिलकीचा आणि शिक्षण व ज्ञान क्षेत्रातील भरीव योगदानाचा सन्मान होय.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पँथर चळवळीचे नेते रमेशभाई खंडागळे, उद्घाटक म्हणून सामाजिक बांधिलकीचे जाणकार बालाजी नवघरे शिरसिकर, स्वागत अध्यक्ष म्हणून भीम कायदा संघटना जिल्हाध्यक्ष विलास गजभरे, बबन इंगोले अमरावती, शेख शकिला बानो, चंद्रभाऊ ठाकरे सामाजिक कार्यकर्ते नागपूर, कार्याध्यक्ष म्हणून अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स चे संस्थापक अध्यक्ष बा.रा.वाघमारे यांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार वितरणाचा सोहळा पार पडला.

अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक बा.रा वाघमारे मातंग समाजातील एक अभ्यासू व त्यागी नेते आहेत. कांशीराम यांचे कार्य ते पुढे नेत आहेत. मातंग समाजासह सर्व बहुजन बांधवांना संघटित करण्यासाठी ते अहोरात्र कष्ट घेत आहेत. नवीन नांदेड सिडको येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विदर्भ आणि मराठवाड्यातील काही निवडक बुद्धिजीवी व आंबेडकरवादी कार्यकर्त्यांना छत्रपती राजश्री शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्याप्रसंगी अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक अध्यक्ष बा.रा वाघमारे यांनी जी काही भूमिका आपल्या भाषणातून मांडलेली भूमिका निश्चित समाधानकारक व सर्वांच्या हिताची होती, म्हणून समाज बांधवांनी बा.रा वाघमारे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे मत प्रतिक्रिया देताना आरंभ वृत्तपत्राचे प्रतिनिधी पी.डी. कसबे यांचेकडे व्यक्त केले.

# जयवंती नदी पात्रातील अतिक्रमण; मुख्यमंत्री जनता दरबारात अभिजीत लोमटे यांनी मांडला प्रश्न

## वरिष्ठांचे आदेश डावलणाऱ्या मुख्याधिकारी व तहसीलदार यांना निलंबित करा अभिजीत लोमटे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मंत्रालयातील दालनात झालेल्या जनता दरबारात जयवंती नदी अतिक्रमण काढण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ मुख्याधिकारी व तहसीलदार यांच्यावर दप्तर दिरंगाईची कारवाई करून बडतर्फ करन्याची मागणी डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी केले आहे.



अंबाजोगाई शहराचे वैभव असलेली जयवंती नदी या नदीमध्ये अनेकांनी अतिक्रमण केल्याने नदीचा प्रवाह बंद झाला असून अंबाजोगाई शहरात पुराचा धोका संभवतो त्यामुळे भविष्यात जीवित वित्त हानी होऊ शकते तसेच जयवंती नदी पात्र व पात्रा लगतचे दस्तऐवज बेकायदेशीर बदलून नकाशावर खाडाखोड करत नदीचा नाला अशी बेकायदेशीर नोंद घेत अनधिकृतपणे बेकायदेशीर नदीपात्रात प्लॉटिंग केली आहे त्यामुळे जयवंती नदीपत्रातील अतिक्रमण काढावे तसेच जयवंती नदीपात्राच्या कागदपत्रात बेकायदेशीर रित्या बदल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे या मागणीसाठी डिजिटल मीडिया परिषदेच्या वतीने अध्यक्ष अभिजीत लोमटे हे नगरपरिषद कार्यालयासमोर २९ एप्रिल आमरण उपोषणास बसले होते मुख्याधिकारी यांनी आठ दिवसाच्या आत अहवाल देऊन अतिक्रमण करण्यासाठी लेखी आश्वासन दिले होते त्यानंतर सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर समिती स्थापन करण्यात आली ही समिती जयवंती नदी पात्रात उतरण्यास टाळाटाळ करत आहे असे निदर्शनास येताच दोन जून रोजी परत उपोषणाचा इशारा देण्यात आला असता समितीने २० दिवसाची मुदत मागितली ती मुदतही संपली मात्र जयवंती नदीपात्रात अद्यापही समिती उतरली नाही. जयवंती नदीपात्रातील बांधकामास मुख्याधिकारी यांनी बेकायदेशीररित्या परवानग्या दिल्या आहेत याचमुळे मुख्याधिकारी व तहसीलदार तसेच समिती वरिष्ठांच्या पत्राला केराची टोपली दाखवत आहे. याप्रकरणी भाजपच्या आमदार नमिताताई मुंदडा याही २०२० पासून सातत्याने पाठपुरावा करत होत्या यावेळी जयवंती नदी पात्र सीमा रेखांकित करण्याचे आदेश दिले आहेत मात्र सीमा रेखांकन अद्यापही करण्यात आले नाही. २००५ साली विधान परिषदेत या प्रकरणी प्रश्न आले होते त्यानंतर जयवंती नदीपात्रात अतिक्रमण करणाऱ्या वर कारवाई करून अतिक्रमण निष्कासित करण्याचे आदेश दिले होते अद्यापही कारवाई झाली नाही. २०२३ ला नगर परिषदेचे सहआयुक्त यांनी तहसीलदार व मुख्याधिकारी यांनी संयुक्त पाहणी करून जयवंती नदी पात्रातील अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी आदेश दिलेले आहेत मात्र हे पत्र मुख्याधिकारी व तहसीलदार यांनी जाणीवपूर्वक दोन वर्ष दाबून ठेवले होते सदरील मुद्दाही आमरण उपोषणामध्ये होता मात्र मुख्याधिकारी सातत्याने जाणीवपूर्वक उपोषणकर्ते डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांची खोटी आश्वासन देत फसवणूक करत आहेत यामागे अतिक्रमण धारक व मुख्याधिकारी, तहसीलदार यांच्यात आर्थिक देवाण-घेवाण झाल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे याचमुळे जाणीवपूर्वक मुख्याधिकारी व तहसीलदार वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाला/ पत्राला केराची टोपली दाखवत आपल्या कार्यामध्ये जाणीवपूर्वक दिरंगाई करत आहेत यामुळे अंबाजोगाई चे मुख्याधिकारी तहसीलदार तसेच समिती तील सर्व अध्यक्ष व सदस्य यांच्यावर दफ्तर दिरंगाई केल्याप्रकरणी बडतर्फीची कारवाई करण्यात यावी.


या आशयाचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांना मुंबई येथे देण्यात आले तसेच जनता दरबारात जयवंती नदीचे जुने अधिकृत दस्तावेज, नकाशा व आत्ता बेकायदेशीर रित्या केलेले दस्तावेज तसेच नदीपात्रातील अतिक्रमण काढण्यासंदर्भात जयवंती नदी बचाव संघर्ष समिती, केज मतदार संघाच्या आमदार नमिता ताई मुंदडा, जयवंती नदी बचाव कृती समिती यांच्या आंदोलना वर आलेले वरिष्ठांचे आदेश हे सर्व जनता दरबारात सविस्तर मांडण्यात आले यावर मुख्यमंत्र्याचे सचिव यांनी पिंपरी चिंचवड च्या धर्तीवर २००५ पासून प्रलंबित असलेला जयवंती नदी पात्रातील अतिक्रमण काढून आपलाही प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन मुख्यमंत्री जनता दरबार येथे डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांना दिले आहे.

# ११ वी प्रवेश प्रक्रियेतील गोंधळा विरोधात शिवसेनेचे तीव्र आंदोलन होणार : मोरे, खेडकर

## अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन रजिस्ट्रेशन या चुकीच्या धोरणाच्या विरोधात शिवसेना आक्रमक

शिरूर कासार । प्रतिनिधी

शिरूर कासार शहरातील व ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन झाल्यामुळे बऱ्याच मुलांना ऑनलाईन करता वेळेस अडथळे आले आणि त्या मुलांचे अद्यापही रजिस्ट्रेशन झाले नाही आणि या ऑनलाइन अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेमुळे तब्बल दीड महिना कॉलेज चालू व्हायला वेळ लागला आहे. या सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे विद्यार्थ्यांसह पालकांचे दमछाक होत आहे. अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन असल्यामुळे मुलांना अनुभव कमी असल्यामुळे ऑनलाईन रजिस्ट्रेशन करता वेळेस असंख्य विद्यार्थ्यांना कॉलेजचं नाव न टाकल्यामुळे आजही मुलांचे ऍडमिशन होऊ शकले नाही त्याचबरोबर ऑफलाइन पद्धतीने जर ऍडमिशन झाले असते तर आत्तापर्यंत कॉलेज सुरू झाले असते.



वास्तविक ऑनलाईन पद्धती मुळे विद्यार्थ्यांचे कमीत कमी एक ते दीड महिन्याचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. त्यामुळे या चुकीच्या धोरणामुळे अजून विद्यार्थ्यांना किती धावपळ करावा लागणार आहे याचा अंदाज नाही म्हणून शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने या शिक्षण विभागाच्या व शिक्षण मंत्र्याच्या चुकीच्या धोरणाच्या विरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी शिरूर येथून पत्रकार परिषद घेऊन दिलेला आहे.

# चिंचगव्हाण भागातील ट्रान्सफर वारंवार होत आहे फेल

## अंधाराच्या साम्राज्यामुळे नागरिक त्रस्त

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथून जवळच असलेल्या चिंचगव्हाण भागातील मोगरे कर फरशी कारखान्या लगत असलेला ट्रान्सफॉर्मर वारंवार फेल होतो आहे, याच्या कारणाकडे लक्ष न देता फक्त तेथे आणून तो बसवला जातो आणि काही दिवस तो चालतो आणि लगेच तो फेल होतो आहे त्यामुळे नागरिकांना अंधारात अनेक रात्री काढाव्या लागत आहे. त्याचबरोबर कोणाकडे दळण नसते, कोणाकडे पाणी नसते, कोणाकडे अजून कोणत्या सुविधा विद्युत नसल्यामुळे नसतात, आणि त्यामुळे सुख सुविधांच्या आहारी गेलेल्या नागरिकांना विद्युत वितरण कंपनीच्या भोंगळ कारभारामुळे त्रास सहन करावा लागत आहे.

आठ दिवस , दहा दिवस किंवा महिनाभराच्या आत या ठिकाणी बसवलेला विद्युत ट्रान्सफॉर्मर वारंवार जळतो आहे, फेल होतो आहे आणि त्याची कारण मिमांसा होत नाही. चांगला दर्जाचा ट्रांसफार्मर कायमस्वरूपी बसवावा असे या अधिकाऱ्यांना वाटत नाही का? काहीतरी काम करायचे म्हणून एखादा ट्रान्सफॉर्मर आणून बसवला जातो, तो आठ दिवस देखील व्यवस्थित काम करत नाही. याला जबाबदार कोण आहे? विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना फोन केला तर त्यांच्याकडे या संदर्भात काहीही माहिती तात्काळ उपलब्ध नसते. नंतर माहिती दिली जाते आणि माहिती सांगून आता आमच्या हातात काही नाही, आम्ही वरिष्ठाकडे कळवू, असे सांगितले जाते. नवीन ट्रान्सफॉर्मर येण्याची वाट पहा. म्हणून सल्ला दिला जातो. पण या दिवसांमध्ये, या कालावधीमध्ये त्या भागातील लोकांना अंधारात राहावे लागत आहे. विजेवर चालणारी सर्व उपकरणे बंद पडतात त्यामुळे नागरिकांना सुख सोयी पासून वंचित राहावे लागते आहे. त्याचबरोबर काही आवश्यक गरजा देखील विद्युत वर अवलंबून असतात, या सगळ्याचा विचार केला तर या भागातील लोकांना सध्या आपण वनवासात तर नाहीत ना? असा भास होत असल्यास नवल नसावे.

विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी या बाबीची दखल घेऊन चिंचगव्हाण येथील मोगरेकर कारखान्या जवळचा ट्रांसफार्मर चांगल्या दर्जाचा बसवावा त्याचप्रमाणे नव्याने बसवलेला हा ट्रान्सफॉर्मर फेल होण्याची कारणे शोधावीत, आणि त्याच्या मुळाशी जाऊन ट्रांसफार्मर फेल होणार नाही याची काळजी घ्यावी अशी या भागातील लोकांची मागणी आहे. विद्युत वितरण अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे वारंवार या भागात अंधाराचे साम्राज्य पसरले जात आहे. याचा विचार विद्युत वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केला पाहिजे, नागरिकांच्या सुख सोयीच्या आड वीज वितरण कंपनीने येऊ नये त्यांना सुख सुविधा पुरविण्यासाठी विद्युत आवश्यक असते आणि ती अशी विद्युत कोणताही खंड न पडता त्यांना मिळवी हा त्यांचा हक्क आहे, हे लक्षात घेऊन तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे अशी मागणी या भागातील संतप्त नागरिकांनी केली आहे.

# जिल्ह्यातील खाजगी क्लासेस बंद करा

## उमाकिरण प्रकरणाने जिल्हा बदनाम; १ जुलै रोजी धरणे आंदोलन

बीड । प्रतिनिधी

खाजगी क्लासेसच्या नावाखाली शहरात सुरू असलेले घाणेरडे प्रकार संताप जनक असून जिल्हाभरात खाजगी क्लासेस मोठ्या प्रमाणात चालत आहेत. या क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांना शिकवण देणारे शिक्षक यांचे चरित्र प्रमाणपत्र तपासणे आवश्यक झाले असून शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुल मधील घडलेल्या प्रकारामुळे पालक वर्गात संताप व्यक्त करण्यात येत असून जिल्हाभरात सुरू असलेले खाजगी क्लासेस बंद करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे.



गुरु शिष्याच्या नात्याला काळीमा फासणाऱ्याउमा किरण येथील खाजगी क्लासेसचे शिक्षकांना तात्काळ अटक करत कडक कारवाई करण्याची मागणी वर्षाताई जगदाळे यांनी केली असून, खाजगी क्लासेस मध्ये शिकवणी घेणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या प्रा. विजय पवार व प्रशांत खटावकर हे दोन्ही आरोपी गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार झाले आहेत. या प्रकरणामुळे खाजगी क्लासेस मधील मुलींची सुरक्षितेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पालक आपल्या मुलांचे भविष्य घडवण्यासाठी खाजगी शिकवणी मध्ये विद्यार्थ्यांना मोठी फिस भरून दाखला घेतात.

या ठिकाणी विद्यार्थ्यांना शिकवणी देणारे शिक्षक यांची गुणवत्ता व चरित्र तपासणी होणे आवश्यक बनले आहे. बीड जिल्ह्यात मागील काही वर्षात महिला व मुलीवर अत्याचारात वाढ झाली आहे. शिक्षण क्षेत्रातील या घटनेमुळे बीड जिल्ह्याची मान शर्माने पुन्हा खाली गेली आहे. विशेष म्हणजे यातील आरोपी हा सामाजिक व राजकीय प्रतिष्ठित असून त्यांच्याकडून असे गैरकृत्य होणे समाजाला अपेक्षित नाही. परंतु अशा हीन मानसिकतेच्या नराधमाला समाजात राहण्याचा कोणताही अधिकार नाही. अशा विकृत लोकांमुळे समाजातचुकीचा संदेश जातो. हजारो विद्यार्थी एका ठिकाणाहून भविष्य घडवण्यासाठी स्वप्न पाहत आहेत त्याच ठिकाणी असे घाणेरडे प्रकार होत असतील तर पालकांनी काय करावे असा प्रश्न उपस्थित होत असून या दोन्ही आरोपींना पोलिसांनी तात्काळ अटक व खाजगी क्लासेस पूर्णपणे बंद करण्याच्या मागणीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर १ जुलै २०२५ रोजी धरणे आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

# ख्रिश्चन समुदायाच्या वतीने सांगलीत जनआक्रोश आंदोलन

## सामाजिक कार्यकर्ते राजन नायर गोपीचंद पडळकर यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यावर ठाम

बीड । प्रतिनिधी

२६ जून २०२५ रोजी सांगली जिल्ह्यातील जत विधानसभा मतदारसंघातील भाजप आमदार श्री गोपीचंद पडळकर यांनी ख्रिस्ती धर्मगुरू विरूध्द केलेल्या वादग्रस्त विधानाबद्दल आणि त्यांना जिवे मारण्याची सुपारी दिल्याबद्दल त्यांच्या अटकेसाठी आणि विधानसभा सदस्यत्व रद्द करण्यासाठी ख्रिश्चन समुदायाने सांगली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनआक्रोश आंदोलन आयोजित केले होते. गेल्या आठवड्यात सांगलीतील एका गर्भवती महिलेने आत्महत्या केल्यामुळे, भाजप आमदार पडळकर यांनी धर्मांतरण प्रकरण म्हणून लोकांना भडकावले आणि ख्रिश्चन धर्मगुरूंना मारण्यासाठी ११ लाख रुपयांची सुपारी दिली.



भारतीय संविधानाच्या कलम २५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व भारतीयांना धर्म बदलण्याचा किंवा स्वीकारण्याचा अधिकार दिला आहे, परंतु आमदार पडळकर यांनी या कलमाला विरोध केला आहे, समाजात बंधुत्वा विरुद्ध लढा देण्याबद्दल आणि मानवी हक्कांचे उल्लंघन करण्याबद्दल व्यक्तत्व केले आहे. या गोष्टींच्या भीतीने महाराष्ट्रातील संपूर्ण ख्रिश्चन समुदायात असंतोषाचे वातावरण निर्माण आहे आणि त्यामुळे ख्रिश्चन समुदायाचे लोक मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरले आहेत आणि त्यांनी सार्वजनिक जन आक्रोश आंदोलन केले आहे.

याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते आणि ख्रिश्चन समुदायाचे धडाडीचे नेते श्री. राजन नायर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, प्रत्येकाला आपल्या हक्कांसाठी लढण्याचा अधिकार आहे, आपण या परिस्थितीला न घाबरता एकजुटीने तोंड देऊ आणि जोपर्यंत महाराष्ट्र सरकार आणि पोलीस प्रशासन श्री. पडळकर यांच्या विधानावर योग्य कारवाई आणि अटक करत नाही तोपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात ख्रिश्चन समुदाय निषेध करत राहील. जर योग्य कारवाई केली गेली नाही तर समुदाय पावसाळी अधिवेशनात विधानसभेला घेराव घालेल.

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे, सर्वांना धर्म स्वातंत्र्य आहे. हिंसाचार भडकवणारा, धमक्या देणारा, धर्मगुरूंना जीवे मारण्याची सुपारी देणारा हा आमदार याला छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आण्णाभाऊ साठे अशा महामानवांच्या महाराष्ट्रात आमदारपद भूषवण्याचा अधिकार नाही. आमदार पडळकर यांच्या अशा वादग्रस्त विधानामुळे मुंबई, पुणे, अहिल्यानगर, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, सांगली आणि महाराष्ट्रातील अशा अनेक ठिकाणी जनआक्रोश आंदोलने आयोजित करण्यात आली आहेत आणि सुरू आहेत.

श्री. राजन नायर यांच्या भाषणात, त्यांनी महाराष्ट्रातील सर्व सामाजिक संघटना आणि पदाधिकाऱ्यांना थेट सभेला येऊन व सोशल मीडियाद्वारे पाठिंबा देणारे आंबेडकर चळवळीतील श्री. दीपक केदार, रिपब्लिकन पार्टी इंडिया आठवले गट, सचिन खरात गट, वंचित बहुजन आघाडी, मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, पास्टर विजय वायदंडे, पास्टर सचिन जाधव, पास्टर सुनील मगधूम, पास्टर पिंटू भोरे, पास्टर मनोज रणधीर, पास्टर रवी मगधूम, पास्टर पांडुरंग वाघमारे, पास्टर जनार्दन वाघमारे, पास्टर संजय पाटील, इलिया माने, पास्टर आमोस मोरे, पास्टर प्रसन्न काळे, वंदना चदनशिव अल्पसंख्याक सांगली जिल्हाध्यक्ष, शाकीर तांबोळी, गॅब्रियल तिवडे, अकादमी तिवडे, जे. आदाटे, श्री.सुधाकर गायकवाड, श्री.मनोज मोरे, प्रा.सुकुमार कांबळे, आंबेडकर नेते, श्री.नाईकवडे आमदार, तानाजी सावंत, मनसे, अध्यक्ष सांगली, आणि अजित सूर्यवंशी यांनी या सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त केले.

# गुटखा वाहतुक व साठ्यावर बीड पोलीसांचा कारवाईचा बडगा

## माजलगाव ग्रामीण व वडवणी पोलीसांच्या वेगवेगळ्या कारवायांमध्ये लाखोंचा गुटखा जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागील काळात अवैध गुटख्याची वाहतूक, साठा व विक्री करणाऱ्या इसमांविरुद्ध जोरदार कारवाया सुरु आहे. त्याचाच भाग म्हणुन काल दिनांक २७/०६/२०२५ रोजी माजलांव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. राहूल सुर्यतळ यांना गोपनीय माहीती मिळाली की, संजय शिवाजीराव होके (वय ३४, रा. पाटील गल्ली, माजलगाव) हा महाराष्ट्र शासनने प्रतिबंधित केलेला गुटखा बेकायदेशीरपणे विक्री करत आहे. सदर माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी सपोनि प्रल्हाद मुंडे, पोअं/१६१९ अंगद घोडके यांचेसह माजलगाव शहरातील जुना मोंढा भागातील न्यू तुळजाभवानी ट्रेडर्स या किराणा दुकानावर छापा टाकला असता संजय शिवाजीराव होके (वय ३४, रा. पाटील गल्ली, माजलगाव) हा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा बेकायदेशीरपणे विक्री करत असल्याचे आढळून आले. त्याच्याकडून विविध कंपनीचा एकूण ३७,४६२/- रुपये किमतीचा गुटखा व १५,०००/- रुपये किमतीचा सॅमसंग मोबाईल असा एकूण ५२,४६२/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच गुटखा आणून देणारा जुबेर सिद्दिकी (रा. माजलगाव) याचाही तपास करण्यात येत आहे. या दोघांविरुद्ध महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची बेकायदेशीर विक्री केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

त्यानंतर दुसऱ्या कारवाई आज दिनांक २८/०६/२०२५ रोजी वडवणी पोलीस ठाण्याच्या सपोनि वर्षा व्हगाडे यांना गोपनीय माहीती मिळाली होती की, वडवणी पोलीस स्टेशन हद्दीतील कुंदेवाडी गावातील इसम नामे संतोष बाबासाहेब कोठुळे हा त्याचे राहते घरात रा. कुंदेवाडी ता. वडवणी येथे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटख्याचा साठा करुन ठेवलेला आहे. त्यावरुन सपोनि वर्षा व्हगाडे यांनी पोअं/१८०९ विलास खरात, ९४९ बिभीषण मुंजाळ, १७४ नवनाथ लटपटे, १९७० किरण इरमले, २०१९ वसंत करे अशा पोलीस स्टाफसह खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे संतोष कोठुळे याचे सहते घरी कुंदेवाडी ता. वडवणी येथे छापा टाकला असता त्याचेकडे याच्या राहत्या घरातून एकूण ३,७२,२००/- किमतीचा विविध प्रकारचा गुटखा माल मिळून आला आहे. सदर प्रकरणात आरोपी संतोष बाबासाहेब कोठुळे रा. कुंदेवाडी ता. वडवणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तसेच तिसऱ्या कारवाईत दिनांक २७/०६/२०२५ रोजी रात्री ११:५५ वा. माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बालक कोळी यांना गोपनीय बातमीदारा मार्फत खात्रीलायक माहिती मिळाली की, आष्टी, जि. जालना येथून एक बोलेरो पिकअप वाहनातून अवैधरित्या गुटखा पो.स्टे. माजलगाव ग्रामीण हद्दीत येणार आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक यांनी पथक रवाना करून पोलीस पथकाने मिडसांगवी पुलाजवळ दबा धरून थांबले असता एक बोलेरो पिकअप (क्र. चक४४ ण ०२६८) येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा दिला असता, वाहनचालकाने तो आदेश न मानता भरधाव गाडी चालवत निघून गेला. पोलीसांनी तत्काळ पाठलाग केला असता टाकरवन तलावाजवळ वाहनचालकाने गाडी जागेवरच सोडून दिली व अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. सदर पिकअपची दोन पंचा समक्ष झडती घेतली असता, १. जापराणी जर्दा, २. राजनिवास, ३. प्रीमियम शॉट ९९९, ४. डायरेक्टर स्पेशल पान मसाला असा सुगंधित व प्रतिबंधित तंबाखू मिश्रित गुटखा आढळून आला. सदर मुद्देमालाची अंदाजे किंमत ११,५३,६२५/- इतकी आहे, तर बोलेरो पिकअप वाहनाची किंमत ९,००,०००/- असून एकूण जप्त मुद्देमालाची एकत्रित किंमत २०,५३,६२५/- आहे.

या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन, बीड यांना कळवून पुढील कायदेशीर कारवाई प्रक्रियेत आहे. माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत गुटखा तस्करीस प्रतिबंध करण्यासाठी ही मोठी कारवाई करण्यात आली आहे. वरील तिन्ही कारवायांमधे एकुण २४,७८,२८७/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवायांमुळे बीड जिल्ह्यातील गुटखा विक्रेते, पुरवठादार, वाहतुकदार यांना मोठा झटका बसला आहे.

सदर कौतुकास्पद कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. निरज राजगुरु यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. बालक कोळी, पोलीस निरीक्षक श्री. राहुल सुर्यतळ, सपोनि वर्षा व्हगाडे यांनी त्यांचे अमंलदारांसह केली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT